# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट** **दिनांक-२१/०५/२०२३**

## "आयपीएल क्रिकेट मॅचवर सट्टा घेणाऱ्यांना अटक"

## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,गुन्हे शाखा,पिंपरी चिंचवड यांची कामगिरी

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालायाचे कार्यक्षेत्रात आयपीएल क्रिकेट मॅचवर बेटींग जुगार चालविणाऱ्यांची माहिती काढुन कारवाई करणे बाबत दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे हिंजवडी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय बातमीवरुन हिंजवडी पोलीस स्टेशन हददीतील फ्लॅट नंबर १४०५, आर १ जी बिल्डींग १४ वा मजला, कोलते पाटील, प्रोजेक्ट,लक्ष्मी चौक ते मारुंजी रोड,हिंजवडी पुणे या ठिकाणी इसम नामे वैभव बाबाराम डिक्कर व इतर ३ ते ४ इसम मोबाइल व लॅपटॉपच्या सहाय्याने लखनौ सुपर जॉइन्ट विरुध्द कोलकत्ता नाईट राईडर्स या आयपीएल मॅचवर ऑनलाईन पध्दतीने वेगवेगळया वेबसाईटवर आयडीव्दारे ऑनलाईन क्रिकेट व इतर सट्टा खेळत व खेळवित आहे. अशा मिळालेल्या बातमीवरुन हिंजवडी पोलीस स्टेशन हददीत सापळा रचुन आरोपींना पकडले आहे. आरोपींच्या ताब्यातुन व घटनास्थळावरुन जप्त केलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालील प्रमाणे.

१) ९०,०००/- रु किं चे दोन लॅपटॉप
२) ३,९०,००० /- रु किं चे १३ मोबाइल फोन
३) १२००/- रु.कि.चे एक स्ट्रिक फायबर वायफाय
४) ००.००/- रु किं चे ०४ नोटबुक

---

असा एकुण **०४,८१,२००/-रु कि.चा.मुद्देमाल मिळुन आला** म्हणुन १) आरोपी वैभव बाबाराम डिक्कर, वय-२८ वर्षे,रा.मुळपत्ता-रा.बजरंगबली मंदिराजवळ,रामटेकपुरा,वॉर्ड नंबर १६, अकोट ता.अकोट जि. अकोला २) सचिन गंगाराम आजगे,वय-२३ वर्षे,मुळपत्ता-वसमाल,ता.साकरी,जि.धुळे ३) विकास कैलास लेंढे वय-२२ वर्षे, रा.राहु पिपळगांव पो.कोरेगाव ता.दौड,जि.पुणे ४) ओमकार बिरा भांड,वय-२० वर्षे, रा.राहु पिपळगांव पो.कोरेगाव ता. दौड,जि.पुणे ५) आशिष निरांजण देशमुख,वय-२८ वर्षे,मु.कोळीवेडी ता.अकोट जि.अकोला ६) महेश परमेश्वर काळे,वय-३३ वर्षे, रा.फ्लॅट नंबर १, जी विंग,बिर्ला गेट,अकोला पाहिजे आरोपी ७) राम भानु शाली ८) विकास रायसिंग चव्हाण ९) प्रकाश भगवानदास तेजवाणी यांचे विरुध्द हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गुरनं **६३५/२०२३,भादंवि कलम ४२०,३४ महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४ (अ),५ व भारतीय टेलीग्राफ ॲक्ट कलम २५ (क)** अन्वये गुन्हा दाखल केला आहे.सदर गुन्हयाचा पुढील तपास हिंजवडी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गाढवे हे करत आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.विनय कुमार चौबे सो।, मा.पोलीस सहआयुक्त डॉ.श्री. संजय शिंदे सो।, मा.अपर पोलीस आयुक्त श्री.वसंत परदेशी सो।, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), स्वप्ना गोरे मॅडम, मा.सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), डॉ. श्री. प्रशांत अमृतकर सो।, यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक प्रदिपसिंग सिसोदे, पोलीस उपनिरीक्षक विजय कांबळे, पोलीस अंमलदार सुनिल शिरसाठ, गणेश कारोटे,वैष्णवी गावडे व तांत्रिक विश्लेषण विभागाचे पोलीस अंमलदार नागेश माळी यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उपायुक्त,गुन्हे
पिंपरी चिंचवड